Date- 19/09/2015

# Cotton Bags Distribution

दै० पुण्यनगरी दि० २० सप्टेंबर २०१५

## 'एसव्हीकेटी 'च्या विद्यार्थ्यांकडून कापडी पिशव्यांचे वाटप



देवळाली कॅम्प, दि. १९ (प्रतिनिधी) - देवळाली कॅम्पच्या लॅम रोडवरील विमलाबेन खिमजी तेजूकाया महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शाही स्नानासाठी नाशिक रोडकडून जाणाऱ्या रस्त्यावर बिटको चौकात भाविकांजवळील प्लास्टिकच्या पिशव्या जमा करून त्यांना कापडी पिशव्यांचे वाटप केले.

नाशिकमधील पर्यावरणाला हातभार लागावा, या हेतूने महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी यात सहभागी होत, प्रत्येक भाविकाजवळील प्लास्टिकची पिशवी सक्तीने काढून घेऊन कापडी पिशवी देत वापरण्याचे आवाहन केले. भाविकांनी या उपक्रमास चांगला प्रतिसाद दिला. याप्रसंगी प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, रासेयो प्रमुख विक्रम काकुळते आदींसह विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

# 'तेजुकाया'कडून रेल्वे स्थानकात स्वच्छता

प्रतिनिधी, नाशिक

देवळाली कॅम्प येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या जयंतीनिमित्त नाशिकरोड रेल्वे स्थानकात स्वच्छता अभियान राबविले.

प्रारंभी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या वेळी प्रा. सुनीता आडके, रासेयोचे प्रमुख प्रा. विक्रम काकुळते, बाळासाहेब मालुंजकर, बाळू पवार उपस्थित होते. त्यानंतर नाशिकरोड रेल्वे स्थानकात रेल परिषदेच्या सहकार्याने प्रा. काकुळते, प्रा. देवराम ढोली यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता करण्यात आली. या वेळी स्वच्छतेसंदर्भात पथनाट्यही सादर करण्यात आले. या वेळी खासदार हेमंत गोडसे, आ. प्रा देवयानी फरांदे, अभिनेत्री प्रिया तुळजापूरकर, बिपीन गांधी, गुरमितसिंग रावल हेही उपस्थित होते.




देवळाली कॅम्प येथील तेजुकाया महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी नाशिकरोड रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छता केली. विद्यार्थ्यांसह खा. हेमंत गोडसे व मार्गदर्शक प्राध्यापक

दि. ६ ऑक्टोबर २०१६

दैनिक दिव्य मराठी
दिव्य सिटी
नाशिक. शुक्रवार, ९ डिसेंबर २०१६

# तेजुकाया कॉलेजच्या रासेयोतर्फे स्वच्छ भारत अभियान रॅली



प्रतिनिधी | देवळाली कॅम्प

## पथनाट्य, फलकांद्वारे विद्यार्थ्यांनी केले प्रबोधन

**प्रा. विनायक गांगुर्डे यांनी नागरिकांना स्वच्छतेविषयी माहिती दिली, तर विद्यार्थ्यांनी देवळाली कॅम्प येथील जुन्या बसस्थानकात 'स्वच्छता' या विषयावर प्रबोधनपर पथनाट्य सादर केले. यानंतर रॅलीतही स्वच्छतेविषयी घोषवाक्ये लिहिलेल्या फलकांद्वारे जनजागृती करण्यात आली. 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत', 'सफाई करा रोज, घाणीचा प्रॉब्लेम करा क्लोज', 'स्वच्छता म्हणजे रोजचा सण, नाहीतर कायमचे आजारपण', 'कचरा करूनी कमी, आरोग्याची मिळेल हमी', 'झाडांना नका करू नष्ट, श्वास घेताना होईल कष्ट', 'झाडे लावा, झाडे जगवा' या घोषणा देण्यात आल्या.**

लॅमरोडवरील मविप्र संस्थेच्या श्रीमती विमलाबेन खिमजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने देवळाली कॅम्प परिसरात गुरुवारी (दि. ८) स्वच्छ भारत अभियान रॅली काढण्यात आली.

महाविद्यालयातून सुरू झालेली रॅली भैरवनाथ मंदिर, संसरी नाका, जुने बसस्थानक, पोलिस ठाणे, स्टेट बँक ऑफ इंडिया यामार्गे परत महाविद्यालयात येऊन समारोप झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांसह देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे कर्नल शुक्ला, उपाध्यक्ष बाबूराव मोजाड, नगरसेविका आशा गोडसे, चंद्रकांत गोडसे आदी मान्यवरांसह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते. या रॅलीत विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत अभियानाच्या घोषणा दिल्या.

रॅलीच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे, प्रा. सुनीता आडके, दौलत शिंदे, प्रा. सुहास फरांदे , प्रा. विक्रम काकुळते, प्रा. वसंत बडवर, प्रा. रामनाथ पगार, प्रा. जयंत महाजन, प्रा. विलास कोरडे, प्रा. विनायक गांगुर्डे, प्रा. युवराज ठोंबरे, प्रा. शशी अमृतकार, प्रा. विष्णू सोनवणे, प्रा. देवराम ढोली, प्रा. शिवाजी चव्हाण, प्रा. संध्या, प्रा. लीला जाधव, प्रा. सुधाकर पवार, प्रा. श्याम जाधव, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. बाळासाहेब तांबे, इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



## समाज कल्याण विभाग

२६ नोव्हेंबर २०१६ देशभर 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यात आला. नाशिक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातही या अनुषंगाने संविधान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष पी. व्ही. पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचारी यांनी संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिकचे उपायुक्त राजेंद्र कलाल, सहाय्यक आयुक्त प्राची वाजे, संशोधन अधिकारी खुशाल गायकवाड, सहाय्यक संचालक हेंमत जाधवर, लेखाधिकारी योगेश आंबरे, किरण ओहळ, गृहप्रमुख बाळासाहेब कामत आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संविधान प्रास्ताविक वाचन कार्यक्रमांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातील प्रादेशिक उपायुक्त, जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, शासकीय वसतिगृह, शासकीय अंधशाळा, शासकीय आयटीआय, महिला व बालकल्याण विभागीय उपायुक्त कार्यालय, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, व विविध मागासवर्गीय महामंडळातील अधिकारी व कर्मचारी संविधान प्रास्ताविक वाचन कार्यक्रमात सहभागी झाले होते.




## तेजुकाया कॉलेज

देवळाली कॅम्प येथील विमलाबेन खिमजी तेजुकाया आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर या संविधान दिनानिमित्त अॅड. चारुशिला खैरनार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात संविधान दिन आपण साजरा का करतो या विषयी माहिती दिली. ते म्हणाले की, भारतीय नागरिकांनी संविधानाच्या नियमानुसार आपले वर्तन केल्यास भारत निश्चित महासत्ता होईल आणि भारत जागतिक लोकशाहीचे नेतृत्व करू शकेल. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी अॅड. चारुशिला खैरनार यांनी आपल्या भाषणात संविधान दिनानिमित्त संविधान विषयक अभ्यासपूर्ण माहिती दिली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सुनीता आडके यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. विक्रम काकुळते यांनी करून दिला. आभार प्रा. महेंद्र पवार यांनी मानले. यावेळी प्रा. दौलत शिंदे, प्रा. सुहास फरांदे, प्रा. कृष्णा गायकवाड, प्रा. चंद्रकांत संधान, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र टाईम्स २७ नोव्हेंबर २०१६

# तेजुकाया महाविद्यालयात संविधान दिन



नाशिक | मविप्र संस्थेच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प येथे राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर या संविधान दिनानिमित्त अॅड. चारुशीला खैरनार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात संविधान दिन आपण साजरा का करतो याविषयी माहिती दिली. ते म्हणाले की जर भारतीय नागरिकांनी संविधानाच्या नियमानुसार आपले वर्तन केल्यास भारत निश्चित महासत्ता होईल आणि भारत जागतिक लोकशाहीचे नेतृत्व करू शकेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संविधानची माहिती करून घेतली पाहिजे. सूत्रसंचालन प्रा. सुनीता आडके यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. विक्रम काकुळते यांनी करून दिला. आभार प्रा. महेंद्र पवार यांनी मानले. यावेळी प्रा. दौलत शिंदे, प्रा. सुहास फरांदे, प्रा. कृष्णा गायकवाड, प्रा. चंद्रकांत संधान, प्रा. विलास कोरडे, प्रा.भास्कर ढोके, प्रा. श्याम जाधव व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

"दै. दिव्यमराठी २७ नोव्हेंबर २०१६"

गांवकरी आज
नाशिक, शनिवार
दि. १७ सप्टेंबर २०१६





। देवळाली कॅम्प । तेजुकाया महाविद्यालयांत रासेयो तर्फे गणेश मूर्ती व निमल्य संकलनाच्या कार्यक्रमप्रसांगीं विलास सैद पाटील, प्रा विक्रम काकुळते, प्रा सुनीता आडके, संजय देवकर आदी.

# तेजुकाया महाविद्यालयातर्फे गणेश मूर्ती व निर्माल्य संकलन

। देवळाली कॅम्प । प्रतिनिधी।

येथील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीनें गणेश मूर्ती व निर्माल्य संकलनाचा कार्यक्रम द्वारणा नदीकिनारी संसारी गाव रासेयो जिल्हा समन्वयक प्रा विक्रम काकुळते यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

याप्रसंगी महाविद्यलयाचे प्रभारी प्राचार्य विलास सैद पाटील, सकाळ सत्र प्रमुख प्रा सुनीता आडके, जु कॉलेजचे प्रा शिवाजी चव्हाण, व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मोठ्या प्रमाणात मूर्तीचे संकलन करण्यात आले. त्यानंतर मूर्ती मानव उत्थान सेवा समितीकडे सुपूर्त करण्यात आल्यात.यावेळी विलास सैद पाटील यांनी आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले कि, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पासून सुरु केलेल्या या प्रयोगाला मोठे यश मिळाले आहे. गेल्या वर्षी विसर्जित मूर्तीचे दान करण्याचा उच्चक ठरला होता. कोणत्याही नदीचे पाणी प्रदूषित होऊ नयें यासाठी नागरिकांचे सहकार्य चांगले मिळाले तर हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकतो. परनु महानगरपालिका व कँन्टोमेंट बोर्ड यांनी मूर्ती विसर्जित करण्यासाठी नदीकाठी जाण्यापेक्षा नागरिकांच्या घराच्या जवळच मोकळे मैदान, मनपा शाळा याठिकाणी कृत्रिम तलावांची उभारणी करायला हवी होती. तसा प्रयत्न स्थानिक नगरसेवक यांनी प्रयत्न करायला हवे होते. तसेच मूर्ती पर्यावरण पूरक असाव्यात. पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेने संशोधन करून जलप्रदूषणासाठी घातक ठरणाऱ्या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती विरघळविण्यांत यश मिळविले आहे. तसा प्रयोग काही ठिकाणी झाला तो जास्तीत जास्त ठिकाणी व्हायला हवा. घरगुती गणेशमूर्तीसाठी हा प्रयोग करायला हवा गणेशमूर्ती पूर्ण बुडेल इतके पाणी बादलीत घेऊन मुर्तीच्या वजनाइतकी अमोनियम बायकार्बोनेट पावडर या पाण्यात टाकून मिश्रण तयार करावे या मिश्रणात गणेशमूर्ती विसर्जित करावी ते दिवसात पूर्ण मूर्ती विरघळते त्याचप्रमाणे शहरात मूर्ती दानाची कल्पना चांगली असली तरी मूर्ती संकलनाची केंद्रे वाढवायला हवीत.

दै. गावकरी
१७ सप्टेंबर २०१६

दैनिक दिव्य मराठी
चंदिगड | हरियाणा | हिमाचल प्रदेश | उत्तराखंड | झारखंड | जम्मू-काश्मीर | बिहार | दिव्य




दि. १७ ऑगस्ट २०१६

स्तुत्य उपक्रम | मविप्रच्या तेजुकाया महाविद्यालयात 'रासेयो'तर्फे स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान; विद्यार्थ्यांकडून जनजागृती

# 'हरित महाराष्ट्र' संकल्पना काळाची गरज

## प्रा. डॉ. के. एन. गायकवाड यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

प्रतिनिधी | देवळाली कॅम्प

वैश्विक उष्णतेत होणारी वाढ आणि हवामानातील बदल याबाबत जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर विचारमंथन सुरू आहे. महाराष्ट्रात वनाच्छादित भौगोलिक क्षेत्र सुमारे २० टक्के आहे. पर्यावरण संतुलन व समतोल राखणे आणि ते टिकविण्यासाठी हे प्रमाण कमीत कमी ३३ टक्के असणे गरजेचे आहे. त्यासाठी वृक्षलागवड करून त्यातून हरित महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील असायला हवे, असे आवाहन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. के. एन. गायकवाड यांनी केले.

देवळाली कॅम्प येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने १ ते १५ ऑगस्ट २०१६ दरम्यान 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवडा' साजरा करण्यात आला. यामध्ये शिक्षकवर्ग तसेच, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात श्रमदान करीत स्वच्छता मोहीम राबवली. तसेच महाविद्यालयाजवळील सौभाग्यनगर, लॅमरोड परिसरात या उपक्रमांतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीद्वारे विविध फ्लेक्स बोर्ड बनवून विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृतीपर घोषणा देत स्वच्छतेविषयी नागरिकांमध्ये प्रबोधन केले. या रॅलीचा शुभारंभ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सोनखासकर यांनीही विद्यार्थ्यांना मागदर्शन करताना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख व जिल्हा समन्वयक प्रा. विक्रम काकुळते यांनी या रॅलीचे आयोजन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सौभाग्यनगर परिसरात जाऊन प्लास्टिक व इतर कचरा गोळा केला. तसेच, या ठिकाणीदेखील नागरिकांमध्ये जनजागृती केली. कार्यक्रमासाठी प्राचार्यांसह राष्ट्रीय छात्र सेनाप्रमुख प्रा. वसंत बडवर, वनस्पतिविभाग प्रमुख प्रा. डॉ. कृष्णा गायकवाड, प्रा. सुहास फरांदे, प्रा. दर्शन कोकाटे, प्रा. कैलास लभडे, प्रा. श्याम जाधव, प्रा. सुनीता आडके, प्रा. अविनाश काळे, मुकुंद रायते, गोपाळ हिरे, यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंधरवडा यशस्वितेसाठी या सर्वांनी परिश्रम घेतले.



तेजुकाया महाविद्यालयात रासेयोच्या वतीने आयोजित 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवडा' उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, रासेयोप्रमुख प्रा. विक्रम काकुळते, प्रा. डॉ. के. एन. गायकवाड, प्रा. बडवर यांसह रासेयोचे विद्यार्थी.

### प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचाच

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर यांनी रॅलीच्या शुभारंभप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामीण व शहरी भागातील वायू, ध्वनी आणि जलप्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी उपलब्ध जागांवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे बनले आहे. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने एक तरी वृक्ष लावून करून त्याची देखभाल करायला हवी. यानंतर प्रा. सुहास फरांदे यांनी 'स्वच्छता अभियानात युवकांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करताना युवकांचा सहभाग किती महत्त्वाचा ठरतो, याकडे लक्ष वेधले.

### दत्तक गावातही श्रमदान करीत नागरिकांमध्ये केली जनजागृती..

राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी दत्तक गाव बेलतगव्हाण येथे ग्रामस्वच्छता, गाजरगवत निर्मूलन करीत वृक्षारोपण केले. तसेच, जनजागृती रॅलीद्वारे प्रत्येकानेच नियमित परिसर स्वच्छता करणे गरजेचे असल्याचे परिसरातील नागरिकांना पटवून दिले.

दैनिक भास्कर

# उत्तर महाराष्ट्र

नाशिक • अहमदनगर • खानदेश

धरना दिया। अपनी मांग को लेकर ... के आदेश दिए।

## रक्षाबंधन के माध्यम से दिया पर्यावरण संवर्धन का संदेश



संवाददाता | देवलाली कैम्प

मराठा विद्या प्रसारक समाज के कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना इकाई ने आयोजित किया रक्षाबंधन कार्यक्रम उत्साह में हुआ।

इस दौरान जिला आपूर्ति अधिकारी सरिता नरके, नगरसेविका आशा गोडसे, विलास धुर्जड ने वृक्षों को रखी बांध पर्यावरण संवर्धन का संदेश दिया। इस दौरान प्राचार्य डा.जेडी सोनखासकर के मार्गदर्शन में रासेयो के जिला समन्वयक प्रा.विक्रम काकुलते, इतिहास विभाग की प्रा.मंगला निकुंभ, प्रा.आडके ने हैपी होम व आनंद वृद्धाश्रम में जाकर वरिष्ठ नागरिकों को राखी बांध उनके साथ त्यौहार मनाया। सफलता हेतु प्रा. सुधाकर पवार, पदार्थ विज्ञान विभाग की डा. संध्या सरदार, प्रा.डा. कृष्णा गायकवाड़, प्रा. देवराम ढोली, प्रा. लीला जाधव आदि प्रयासरत थे।

२२ ऑगस्ट २०१८

'दैनिक भास्कर'

एकमेव निःपक्ष वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स



www.maharashtratimes.com

नाशिक । गुरुवार, ६ ऑक्टोबर २०१६ ◆ पाने १४ + ६ (नाशिक प्लस) ◆ शहर आवृत्ती ◆ ₹ २.५०




# वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळा

**म. टा. वृत्तसेवा,** देवळाली कॅम्प

**पोलिस उपायुक्त विजय पाटील यांचे आवाहन**

रहदारीतील अपघात टाळण्यासाठी २० कलमी कार्यक्रम राबवायला हवा. अपघातात जर आपल्याच घरातील एखादी व्यक्ती सापडल्यास आपली काय अवस्था होते व ती होऊ नये म्हणून वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालन काटेकोरपणे करणे हे आपण नेहमी लक्षात ठेवायला हवे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विजय पाटील यांनी केले.

श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखसकर, प्रा. सुनीता आडके, प्रा. सुधाकर पवार, प्रा. देवराम ढोली, प्रा. लीला जाधव आदी उपस्थित होते. प्रा. विक्रम काकुळते यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती व उद्दिष्ट्ये विशद करताना सांगितले की, समाजाच्या गरजांची माहिती करून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, साक्षर व निरक्षर यांची दरी कमी करणे, संकटकाळी व नैसर्गिक आपत्तीस मदत करणे, गरीब वर्गाची सेवा करणे या उद्दिष्टांसोबत राष्ट्रीय सेवा योजनेत राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार व विकास करण्यासोबत रस्ता सुरक्षा, स्वच्छ भारत व मतदार जनजागृती अभियान या तीन मुद्यांवर भर देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा चौधरी, आरती कुटे तर आभार मेघा शिंदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाईम्स ६ ऑक्टो २०१६

दैनिक दिव्य मराठी



**गौरवास्पद** | वर्षभर राबवलेल्या जनजागृतीपर उपक्रमांची पुणे विद्यापीठाकडून दखल

# रस्ता सुरक्षा अभियान पुरस्कार तेजुकाया महाविद्यालयास प्रदान



मविप्रच्या तेजुकाया महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या रस्ता सुरक्षा अभियानाचा पुरस्कार कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर. समवेत प्रा. विक्रम काकुळते, प्रा. सुनीता आडके, संजय कदम यांसह पुणे विद्यापीठाचे पदाधिकारी.

## विशेष सोहळ्यात कुलगुरूंकडून गौरव

प्रतिनिधी | नाशिक

येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प या महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत रस्ता सुरक्षा अभियानाचा पुरस्कार सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुणे विद्यापीठात नामदेव सभागृहात झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक गुणगौरव समारंभात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. विक्रम काकुळते, सकाळ सत्रप्रमुख प्रा. सुनीता आडके व ग्रंथालयातील संजय कदम यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महाविद्यालयाने मागील वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान प्रभावीपणे राबविले. यात महाविद्यालयात मोटारसायकलने येताना हेल्मेटसक्ती, बिटको सिग्नलवर रासेयो विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर फलक हातात घेऊन विविध नियमांचे पालन करण्याबाबत, सिग्नलवर वाहन बंद करून इंधन बचत करणे यांबाबत नागरिकांचे उद्‌बोधन केले. त्यास चांगला प्रतिसादही मिळाला. ट्रॅफिक विभागाचे हनुमंत गाडे यांनीही महाविद्यालयाचे कौतुक केले. आठवड्यातील एक दिवस सार्वजनिक वाहनाचा महाविद्यालयात येताना वापर या निर्णयाचेही त्यांनी स्वागत केले. यावेळी रासेयो समन्वयक डॉ. संजयकुमार दळवी, मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय खरात व पाचगणी येथील बहाई संस्थेचे डॉ. लेसन आझादी उपस्थित होते.

या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रतापदादा सोनवणे, सभापती नितीन ठाकरे, सरचिटणीस नीलिमा पवार, उपसभापती नाना दळवी, चिटणीस सुनील ढिकले, नाशिक तालुका संचालक नाना महाले, मुरलीधर अण्णा पाटील व तुषार शेवाळे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

### जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन

**महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनखासकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने जनजागृतीपर उपक्रम राबवले जातात. मागील वर्षी याच महाविद्यालयाला सर्वात जास्त रक्तदान केल्याबद्दल पुरस्कार मिळाला होता. राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गतही विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यात नाम फाउंडेशनला एक लाखाचा निधी, सेवक वर्ग व विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या धान्याचे अनाथ मुलांच्या वसतिगृहात वाटप आदी उपक्रमांचा उल्लेख होतो.**

### 'रासेयो' प्रमुखांचाही विशेष सत्कार

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय आव्हान शिबिराचे जिल्हास्तरीय आयोजन याच महाविद्यालयात होऊन ३६ जिल्ह्यांतून नाशिक जिल्ह्याला उत्कृष्ट जिल्हा म्हणून गौरविण्यात आले होते. या विजयी संघाचे नेतृत्व रासेयोप्रमुख प्रा. विक्रम काकुळते यांनी केले होते. या यशस्वी कामगिरीबद्दल त्यांचाही या विशेष सोहळ्यात कुलगुरू डॉ. गाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

– ९ ऑगस्ट २०१६ –

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी
www.gavakari.net
शुक्रवार, ७ ऑक्टोबर २०१६ ■ वर्ष ७७ ■ अंक ४३ ■ किंमत रु. ४ ■ पाने १६ ■ नाशिक

# 'तेजुकाया' मध्ये रासेयोतर्फे मतदार नोंदणी अभियान

। देवळाली कॅम्प । प्रतिनिधी ।

येथील विमलाबेन खिमजी तेजुकाया कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ात राष्ट्रीय सेवा योजना व भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे उदघाटन तहसीलदार डॉ राजश्री अहिरराव , नायब तहसीलदार सुरेश कांबळे, मंडळ अधिकारी प्रवीण गोंडाळे व विहितगावचे तलाठी रमेश उगले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

प्रास्ताविक रासेयो प्रमुख प्रा विक्रम काकुळते यांनी तर आभार प्रा भूगोल विभागाचे प्रा बाळासाहेब तांबे यांनी मानले

तहसीलदार डॉ राजश्री अहिरराव यांनी स्पर्धा परीक्षा संदर्भात माहिती दिली. नायब तहसीलदार सुरेश कांबळे यांनी मतदाराने फॉर्म कसा भरावा व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे काय असायला हवी याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ जे डी सोनखासकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम आक्टोबर पर्यंत राबविण्यात येत आहे. त्याचा जास्तीत जास्त विध्यार्थ्यांनी सहभागी होऊन मतदार व्हावे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही मानणारा देश असून जागरूक मतदार हा त्याचा मुख्य आधार आहे. त्यासाठी जास्त युवावर्ग असलेल्या देशात युवकांनी मोठ्या संख्येने मतदान करण्यास पुढे सरसावले पाहिजे.

या कार्यक्रमासाठी सूक्ष्म विभागाचे प्रा सुहास फरांदे , रासेयो प्रमुख प्रा विक्रम काकुळते, भूगोल विभाग प्रमुख प्रा श्याम जाधव, प्रा प्रभाकर वरखेडे, प्रा मंगला निकुंभ, प्रा श्रीमती निसाळ, प्रा महेंद्र पवार, व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

दै. गावकरी दि ७ ऑक्टो. २०१६

# रॅलीद्वारे एड्स

## एसव्हीकेटी महाविद्यालय

नाशिकरोड : वार्ताहर

येथील श्रीमती विमलबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांनी शहरातील मुख्य चौकातून एड्स जनजागृती रॅली काढली.

दरवर्षी डिसेंबरच्या १ ते १५ तारखेदरम्यान एड्स जनजागृती पंधरवडा साजरा केला जातो. यानिमित्त विमलबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी साडेनऊ वाजता महाविद्यालयातून रॅलीला सुरुवात करण्यात आली. बेलतगव्हाण नाका, भैरवनाथ मंदिर, संसरी नाका, गुजर शाळा मार्गे जुने बसस्थानक येथून रॅली काढण्यात आली.

जुने बसस्थानकानंतर पोलीस स्टेशन मार्गे पुन्हा संसरी नाका बेलतगव्हाण नाका मार्गे विमलबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयात रॅलीचा समारोप झाला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश पगारे, राष्ट्रीय छात्र विभागाचे प्रमुख कॅप्टन वसंत बडवर यांनी रॅलीचे आयोजन केले. उपप्राचार्य प्रा. विलास सैंदपाटील, प्रा. श्याम जाधव, प्रा.मंगला निकुंभ, प्रा. डॉ. स्वाती सिंह, प्रा. सविता आहेर, प्रा. भास्कर ढोके, प्रा. विष्णु सोनावणे, प्रा. विलास कोरडे, प्रा. विनायक गांगुर्डे, सुनील गोसावी, दत्तू आहेर, बाळू पवार आदी उपस्थित होते.



नाशिकरोड : प्रबोधन रॅलीमध्ये सहभागी प्राचार्य डॉ.विजय मेधणे, विलास सैंदपाटील प्रा.प्रकाश पगारे, राष्ट्रीय छात्र विभागाचे प्रमुख कॅप्टन वसंत बडवर यांसह विद्यार्थी व प्राध्यापक.

(छाया : उमेश देशमुख)

**ATTESTED**

PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

# 'एसव्हीकेटी'तर्फे एड्सविषयक जनजागृती रॅली

म. टा. वृत्तसेवा, देवळाली कॅम्प

देशाची भावीपिढी एड्सपासून सुरक्षित रहावी, तसेच एड्ससंदर्भातील सुरक्षिततेबाबतची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी येथील एसव्हीकेटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली. या रॅलीमार्फत प्रबोधनपर फलकांद्वारे जनप्रबोधन करण्यात आले.

डिसेंबरच्या १ ते १५ तारखेदरम्यान एड्स जनजागृती पंधरवडा साजरा केला जातो. त्यानिमित्त येथील श्रीमती विमलबेन खिमजी तेजुकाया कॉलेजतर्फे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांच्या मार्गदर्शनाखाली देवळाली कॅम्प शहरात काढण्यात आलेल्या रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. एड्स असेल जेथे जीवनाचा नाश तेथे, सावधानता हीच सुरक्षितता आदी प्रबोधनपर फलकांद्वारे त्यांनी परिसरात प्रबोधन केले.



प्रशांत शिंदे

लामरोड-संसरी नाका-हौसनरोडमार्गे जुने बसस्थानक येथे रॅली दाखल झाली. यावेळी चंद्रकांत गोडसे, संजय गिते आदी मान्यवर रॅलीत सहभागी झाले होते. जुने बसस्थानकातील पोलिस स्टेशन-आनंदरोड-स्वामीसमर्थ मार्गे कॉलेजात रॅलीचा समारोप करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश पगारे, राष्ट्रीय छात्र विभागाचे प्रमुख कॅप्टन वसंत बडवर यांनी संयोजन केले. उपप्राचार्य प्रा. विलास सैदपाटील, प्रा. मंगला निकुंभ, प्रा. भास्कर होके, प्रा. विष्णू सोनवणे, प्रा. विलास कोरडे, प्रा. विनायक गांगुर्डे, प्रा. श्याम जाधव, प्रा. सविता आहेर आदींसह एनएसएस, एनसीसी व कॉलेजचे विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते.

देशदूत मंगळवार 5 डिसेंबर 2017

# एसव्हीकेटीतर्फे एड्स जनजागृती रॅली

■ दे. कॅम्प । दि. ४ वार्ताहर

येथील एसव्हीकेटी महाविद्यालयातर्फे शहरातील मुख्य चौकातून काढण्यात आलेल्या एड्स जनजागृती रॅलीत शेकडोच्या संख्येने विद्यार्थी सहभागी होत विविध घोषणा असलेले फलक हाती घेत प्रबोधन केले.

डिसेंबरमध्ये एड्स जनजागृती पंधरवाडा साजरा केला जातो. सकाळी साडेनऊ वाजता महाविद्यालयातून रॅलीला सुरूवात झाली. बेलदगव्हाण नाका, भैरवनाथ मंदिर, संसरीनाका, सुभाष हायस्कूल मार्गे जुने बस स्थानक येथे रॅली दाखल झाली. यावेळी प्राचार्य



डॉ. विजय मेघणे म्हणाले, समाजात एड्सबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी स्वयंसेवी संस्थाप्रमाणे विद्यार्थ्यांचे प्रयत्नही महत्वाचे आहे. या आजारापासून दूर राहण्यासाठी घ्यावयाची काळजीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. रॅलीचे आयोजन प्रा.प्रकाश पगारे, वसंत बडवर यांनी केले. याप्रसंगी युवानेते चंद्रकांत गोडसे, उपप्राचार्य प्रा. विलास सैदपाटील, प्रा. शाम जाधव, प्रा. मंगला निकुंभ, प्रा. डॉ. स्वाती सिंह, प्रा. सविता आहेर, प्रा. भास्कर होके, प्रा. विष्णू सोनवणे, प्रा. विलास कोरडे, प्रा. विनायक गांगुर्डे, सुनील गोसावी, दत्तु आहेर, बाळू पवार आदी उपस्थित होते.

**ATTESTED**

**PRINCIPAL**
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

## रस्ता सुरक्षा जनजागृती



**देवळाली कॅम्प :** एनसीसीच्या ७ महाराष्ट्र बटालियनच्या वतीने शनिवारी (दि. १६) सन १९७१ भारत-पाकिस्तान युद्धाच्या विजय दिवसा निमित्ताने रस्ते अपघात व वाहतूक शिस्त याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. या जनजागृतीवेळी कर्नल यू. एस. कुशवाह यांच्या आदेशानुसार श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कॉलेजच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. कॅप्टन वसंत बडवर यांच्या मार्गदर्शनाखाली संसरी नाका येथे नागरिकांना रस्ता सुरक्षा व वाहतुकीविषयी जनजागृती करीत रस्त्यावर काहीकाळ वाहतूक नियंत्रित केली. या वेळी एएसआय महेश साळी, चंद्रभान भोईर, बाळासाहेब बोटे, विशाल विखे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

लक्ष महाराष्ट्र | 15/08/2019

# प्रेमाचे बंधन एका धाग्यात

भारतीयसंस्कृती वंदनीय, पूजनीय आहे. भारतीय संस्कृतीतील रूढी-परंपरा पूर्वीपासून आजपर्यंत जपल्या आहेत. भारतीय कालगणनेत वर्षभरात मराठी महिन्यात श्रावण महिना अधिक महत्त्वाचा, श्रेष्ठ मानला जातो. व्रत-वैकल्यांनी सजविलेला श्रावण महिना भारतीय संस्कृतीची सौंदर्यरुपी खाण श्रावणसरींप्रमाणे मानवी जीवनाला आनंद प्राप्त करून देतात. श्रावणातील अनेक सणांपैकी रक्षाबंधनाला विशेष महत्त्व आहे. मानवी नात्यांतील अतूट बंध एका धाग्याने बांधले जाते. बहिण-भावाच्या विश्वासाला, अलौकिक प्रेमाला श्रेष्ठत्व प्राप्त करून देणारा दिवस.... श्रावणातील चौथी पूर्ण चंद्राने श्रावण पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. हाच पूर्ण चंद्र भाऊ आणि बहिणीच्या प्रेम आणि कर्तृत्वाच्या संबंधाने समर्पित आहे. श्रावणातील पूर्ण चंद्र पौर्णिमा म्हणून हा दिवस रक्षाबंधन 'नावाने ओळखला जातो. रक्षाबंधन' नावसंरक्षणाचे बंधन' आहे.

बहिण-भावाच्या नात्याला अधोरेखीत करणारा रक्षाबंधन उत्सव आहे. रक्षाबंधनाची खरी सुरूवात कधी झाली याबाबत निश्चित कालावधी नाही परंतु पौराणिक, धार्मिक ग्रंथांनुसार अनेक कथा राखी पौर्णिमा सणाच्या आहेत. पारंपारिक कथांमध्ये एकदा देव आणि राक्षस यांच्या युद्ध सुरू झाले.... युद्धात देव पराभूत आणि राक्षस विजयी होणार अशी परिस्थिती निर्माण झाली तेव्हा इंद्रदेवाची पत्नी इंद्राणी हिने मनगटावर एक संरक्षक धागा रक्षासूत्र' बांधल.... इंद्रदेवाचा आत्मविश्वास वाढला. दुसऱ्या दिवशी देवांचा विजय झाला. तेव्हापासून संरक्षणासाठी पुत्यांच्या मनगटावर अडचणींच्या वेळी धागा रक्षण करतो विश्वास बसला. काळाच्या ओघात बहिणी



भावांना राखी बांधते आणि तिच्या रक्षणाची जबाबदारी घेतल्याचे भाऊ वचत देतो अशी प्रथा रूढ झाली आहे. पौराणिककथांमध्ये महाभारतात श्रीकृष्ण आणि द्रौपदीचे नाते बहिण-भावाचे होते. श्रीकृष्णानेशिशुपालाचा वध केल्यानंतर सुदर्शन चक्र कृष्णाकडे परत आले तेव्हा कृष्णाच्या बोटातून रक्त आले. द्रौपदीने क्षणाचाही विलंब न करता आपल्या भरजरी महावस्त्राची किनार फाडून कृष्णाच्या बोटावर चिंधी बांधली. तेव्हा कृष्णाने आजन्म द्रौपदीचे संरक्षण करण्याचा संकल्प केला. जेव्हा दुःशासन द्रौपदीचे वस्त्रहरण करत होता तेव्हा कृष्णाने ऋण फेडून द्रौपदीला वस्त्र दिले.... तिचे रक्षण केले.... तेव्हापासूनरक्षाबंधन' साजरा करण्याची प्रथा सुरू झाली. नंतरच्या कालखंडात मेवाड प्रांताची चितोडची राणी कर्णावतीने बहादुरशहापासून स्वतःचे आणि आपल्या राज्याचे रक्षण करण्यासाठी मुगल सम्राट हुमायूनला राखी पाठवली होती. राखीचा मान राखत हुमायूनने राणी व राज्याचे रक्षण केले. राजपूत स्त्रिया आपल्या शत्रूंच्या हातावर राखी बांधून भविष्यातील संकटे दूर करत. नोबेलपुरस्कार विजेते रवीन्द्रनाथ टागोर यांनी बंगालच्या विभाजनानंतर हिंदू व मुस्लिम यांच्यातील सलोखा निर्माण करण्यासाठी दोन्ही समाजातील लोकांना एकमेकांच्या हातावर राखी रक्षासूत्र' बांधण्याची विनंती केली. एक प्रकारे राखीचा उपयोग अहिंसेसाठी करत असत. असे असले तरी सणाचा हेतू, उद्देश महत्त्वाचा आहे.



राखी एक धागा नसून सामाजिक एकोपा जपण्याचे, पवित्रता, स्नेह आणि शीलाचे रक्षण करणारे एक पवित्र बंधन आहे. रक्षाबंधनाने अनेकांची मने एकमेकांशी जोडली जातात. मन जवळ येतात, मायेचा भावनिक ओलावा टिकून राहतो. फक्त रक्ताच्या नात्यांतच नव्हे तर सर्व धर्मांत नाती दृढ होत आहेत. नाती जपणारा हा सण म्हणूनच श्रेष्ठ आहे. बहिण-भावाच्या प्रेमाचे बंधन हातावर राखी बांधून भावाचे हृदय प्रेमाने जिंकून घेणारी बहिण असते. यानिमित्ताने बहिण मिठाई किंवा तत्सम पदार्थ भरवून भावाचे तोंड गोड करते. कुटुंबात आनंदोत्सव असतो.

जगातील सर्व नात्यांमध्ये बहिण-भावाचे प्रेम निस्वार्थीआणि पवित्र असते. भारतीय संस्कृती मानवी जीवनातील महानतेचे दर्शन घडविते. राखी बांधतांना बहिण-भावाला ओवाळते तेव्हा कपाळी कुंकवाचा टिळा लावते. टिळा लावून त्याच्यावर विश्वास व्यक्त करते. सहज वाटणारी टिळा लावणे ही क्रिया परिवर्तनाच्या महान प्रक्रियेशी जोडलेली आहे. विचार आणि बुद्धीवरील विश्वासाचे एक दर्शन आहे. जगाकडे पाहणाऱ्या नजरेत भावनात्मक, वात्सल्याचे प्रतिक असते. म्हणूनच जगाकडे पाहण्यासाठी तिसरा पवित्र डोळा बहिणी आपल्या भावाला देतात. हा एक संकेत आहे. याच संकेतातून रक्षाबंधन विषय घेऊन अनेक चित्रपट पडद्यावर यशस्वी झालेले आहेत.

देशभरात रक्षाबंधनाला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. उत्तर भारतात सर्वात आधीपासून या सणाचे महत्त्व आहे. उत्तर भारतात केजरी पौर्णिमा', पश्चिम भारतात नारळी पौर्णिमा' उत्सवात रक्षाबंधन रूपाने साजरी केली जाते. बदलत्या काळानुसार आज प्रगत तंत्रज्ञान युगात माहिती-तंत्रज्ञानाच्या, सोशल मिडीयाच्या युगातसुद्धा भारतीय सण-उत्सवांना स्थान आहेच. सोशल मिडियावरून देश-विदेशात कामानिमित्ताने स्थिर झालेले भाऊ-बहिण संपर्क साधून रक्षाबंधन साजरा करतात. विदेशात आपल्या सणांचा उत्सव साजरा करण्यात भारतीय आघाडीवर आहेत. ई-शुभेच्छा मागे भावना एकच आहे.

बहिणीचा भाऊ कुठेही असो, हिंदू संस्कृतीनुसार श्रावण पौर्णिमेला बहिण भावाच्या दीर्घ आयुष्य व सुख-समृद्धी लाभावी हीच प्रार्थना करते. मानवी जीवनामध्ये मांगल्याचे, पावित्र्याचे बंधन प्रगट करणारा हा सण आहे.

भारतीय संस्कृतीत स्त्री देवी-स्वरुपात मानली आहे. स्त्री कितीही मोठी झाली तरी रक्षणाची जबाबदारी भावावर सोपविते. याचा अर्थ ती दुबळी नाही पण भावाच्या कर्तृत्वावरचा विश्वास रक्ताच्या नात्यामागील भावना पवित्र व खरी असते. नात्यातील कृतज्ञता व्यक्त करणारा रक्षाबंधन दिवस राखी पौर्णिमा' म्हणून साजरा केला जातो.

- डॉ. जयश्री जाधव-कदम
मो. नं. ९८५९९२८८५८

ATTESTED
PRINCIPAL
Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

# पर्यावरण संरक्षणाची गरज जाण मानवा


जगाचे तापमान २१व्या शतकाच्या शेवटी चार ते सहा अंश सेल्सिअस एवढे वाढण्याची शक्यता शास्त्रज्ञ व्यक्त करत आहेत. जगाचे तापमान-पर्यावरण असंतुलित झाल्याने हवामानाची दिशा बदलत आहे. निसर्गाला आव्हान देण्याचा मानवाचा प्रयत्न मानवी आरोग्याला घातक ठरत आहे. जगाने विकासात्मक भूमिकेचा अर्थ समजून घेतांना ज्या-ज्या विकासाच्या अनेक बाबी साध्य केल्या. विकसित देश म्हणून क्रमांकाने यादी तयार झाली जगातीलसर्वच राष्ट्र आपले नाव विकासाने पुढे यावे यासाठी प्रयत्न करत आहेत. विकासाच्या नावाने साध्य बाबींमुळे आपण स्वतःच्या ऱ्हासाला जवळ करत आहोत हेच सध्यातरी स्पष्ट दिसत आहे.

पर्यावरण बदलाला मानवच कारणीभूत आहे हे तर जगजाहीर आहे. आपला ऱ्हास जवळ आला म्हणून जगाला जाग आली अन् जागतिक पातळीवर एकत्र येऊन विचार-विनिमय करून जगाच्या भविष्यासाठी उपाय शोधू लागले. नेहमीप्रमाणे अमेरिका आपला अहवाल न देण्याच्या भूमिकेत आहे कारण सर्वात जास्त कार्बन डाय ऑक्साईड अमेरिकेत उत्सर्जित होतो. भारत तर उच्चांक गाठणारा ठरला. जागतिक आरोग्य संघटनेने जगातील प्रदुषित शहरांची यादी जाहीर केली. त्यात जगातील १५ सर्वाधिक प्रदुषित शहरांच्या यादीत १४ शहरे भारतातील आहेत. कानपूर शहर प्रथम क्रमांकावर असून इतर शहरांमध्ये फरिदाबाद, गया, पाटणा, आग्रा, मुजफ्फरपूर, श्रीनगर, जयपूर, जोधपुर या अनेक शहरांबरोबरच एकेकाळी राजधानी दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदुषित शहर होते. आज दिल्लीमध्ये पुन्हा प्रदुषणातप्रचंडवाढझालीआहे. लोक मास्क लावून घराबाहेर पडत आहेत. मानवी जीवनासाठी 'आरोग्य' मानवी विकास निर्देशांकाने मोजले आहे. भारतात मानवी आरोग्याचा बाजार मांडला असून बाजारात भाव लावला जात आहे. आरोग्य बिघडल्याने हॉस्पिटलला सुगीचे दिवस आले आहेत. काही देशांमध्ये खाजगी हॉस्पिटल



नाही. शासन आरोग्याच्या सुविधा देण्यात तत्पर असते. कारण आरोग्य बिघडताच मानवाच्या मनावर, कार्यावर परिणाम होतो. यामुळेहुशार देश त्यांच्या देशातील लोकांच्या आरोग्याची काळजी स्वतः घेतात. भारताची स्थिती आरोग्याबाबत सर्वांना माहित आहे. सत्ता-संपत्तीच्या बळावर स्वतःच्या आरोग्यासाठी विदेशात उपचार घेणारा आपला श्रीमंतांचा देश.गरीब मात्र अंथरुणावर आयुष्यभर मरणयातना भोगतो अथवा स्मशानात जातो, असा गरीबांचा देश.प्रगतीप्रगती साध्य करत आहे, परंतु'आरोग्य' या विषयावर काही बाबतीत प्रगतीचा आलेख दाखवून खऱ्या आरोग्याबाबत मात्र कागदच रंगविले जात आहेत.

**विशेष**



प्रा.जयश्री जाधव-कदम

पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी मोठमोठे इव्हेन्ट घेतले. प्रसिद्धीमाध्यमांतून रंगविलेले रंग खऱ्या आरोग्याला खोकला करत आहे. पर्यावरणाबाबतचे नियम क्षुल्लकपणे पाळूनकानाडोळा करण्यात हुशारी करणारेआपणत्यामध्ये चार-दोन खरोखर कार्यात तप्तर आहेत, सर्वांसाठीनियमांची चौकट सक्तीची केल्यास पर्यावरण संवर्धन होऊ शकते.

पर्यावरणाचीजाणीव, गरज भविष्याचे परिणाम विचारात घेऊन भारताने हाविषय अभ्यासक्रमासाठी दिला, प्रबोधन केले, वृक्षारोपण केले. शासकीय पातळीवर शिक्षण आणि अनेक क्षेत्रांना दिलेले काम योग्य होते. परंतु कार्याच्या यशासाठी कायदे-नियम-तत्परता महत्त्वाची असते. लहानपणीच शाळेत शिकवलेले अजूनही आठवते. गुरुजी सांगत मुलांनो श्वास नाकाने घ्या. तोंडाने श्वास घेण्यासाठी तोंड उघडले तर धुळीचे कण आपल्या शरीरात प्रवेश करतात. अन् आपल्याला आजारी पाडतात. त्यामुळे आपण आजारी होऊ नका. आणि हो, हे घरी सांगा. घरच्यांकडून कृती करून घ्या. अन् गुरुजी श्वास घेण्याचे धडे. जणूकाही प्राणायाम शिकवत ते आज समजते.

आज मात्र प्राणायामासाठी खाजगी क्लास लावावे लागतात. शरीराच्या आरोग्यासाठी शाळेतील धडा घेण्याऐवजी सतराशे-साठ काम शिक्षकांच्या माथी दिल्याने विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षणाचे धडे देऊन परिपूर्ण विद्यार्थी घडविण्याऐवजी कागद पूर्ण करणे आपल्याकडेमहत्त्वाचे असते. आता ऑनलाईन प्रक्रिया गुरु-शिष्य नात्यात दुरावा निर्माण करत आहे. कधी-कधी वाटतं कि आश्रम व्यवस्थाशिक्षणासाठी योग्यच होती.

आधुनिकतेच्या नावाने चंगळवाद मांडला अन् मानवीजीवनाचे तीनतेरा केले. अजूनही वेळ आहे. नियोजनाने पर्यावरणाबाबत मनामनात-घराघरात प्रत्येक व्यक्तीला जागृत करण्यासाठी प्राथमिक शाळेपासून विद्यार्थी घडविणे. विद्यार्थी तयार करू तेव्हाचपर्यावरणाचे महत्व विद्यार्थ्यांना समजून त्यांच्या मनाच्या आरोग्याचा विचार होणे आवश्यक आहे. बालवयात विद्यार्थ्यांच्या विचारावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे. राष्ट्राच्या भवितव्यासाठी पर्यावरणहा जीवनमरणाचा विषय बनला आहे. निरोगी जीवन जगण्यासाठी शासकीय पातळीवर योग्य नियोजन झाल्यास मानवी आरोग्य सुधारू शकते. शासकीय पातळीवर फक्त 'झाडे लावा, झाडे जगवा' हीच कृती केली जाते. अहवाल मागविले जातात. परंतु असंख्य प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी ठोस उपाययोजना हव्यात.

लक्ष महाराष्ट्र 10/11/2019

ATTESTED
PRINCIPAL
Shri Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

CamScanner

# एडस् दिनाचा मानवता संदेश


१ डिसेंबर जागतिक एडस् दिन साजरा केला जातो. एडस्बद्दल अजूनही समाजामध्ये गैरसमज, अपराध भावना दिसून येते. आजही लोक एडस् ऐकल्यानंतर चर्चा करायला, बोलायला घाबरतात. बाधितरुग्णाची, कुटुंबाची चिंता करत बसतात. एडस् नावापेक्षा भयानक आहे कारण व्यक्तीला समोर मृत्यू दिसतो. एच.आय. [illegible] एडस् निर्मुलनासाठी शासकीय स्तरावरून विशेष सुविधा देऊन मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. खाजगी संस्थांचा सहभाग मोहीम यशस्वी करण्यासाठी आहे. व्यक्तीला एच.आय.व्ही.ची लागण होते कशी आणि त्यानंतर रुग्णांनी औषधोपचार पद्धती समजून घेण्यासाठी जनजागृती केली जाते. खास संदेश देऊन एच.आय.व्ही. लागण न होण्यासाठी पथनाट्य, व्याख्यानांद्वारे शाळा, महाविद्यालय, स्वयंसेवी संस्थांकडून प्रबोधन केले जाते. एडस्बाधित रुग्ण स्वतःला एकाकी समजतात. असहाय्य होतात. मानसिक दुर्बलता येते. जेव्हा शासन, स्वयंसेवी संघटनांकडून मानसिक मदतीचा हात पुढे येतो तेव्हा रुग्ण आपोआप पुढे येतात. एकत्र जमतात. त्यांना स्वतःला हळूहळू मनावरील ओझं हलके वाटू लागते. [illegible]ला उभारी मिळते. स्व-दुःखातून, निराशा, मरणयातनांची जाणीव दूर होऊन जगण्याची नवी वाट मिळते. बाधित रुग्ण जगण्याची नवीन वाटस्वीकारण्यासतयार होतो तेव्हाच माणुसकीचा अर्थ समजतो. रुग्णाला कुटुंबाकडून तुच्छतेच्या, हीनतेच्या वागणुकीमुळे, टोचून बोलणे ऐकू येत असते. रुग्ण त्याच वेळेपासून मरणाच्या दारात जातो. नंतर औषधांवरील खर्च कुटुंबाला परवडत नाही त्यामुळे रुग्णाला संतुलित आहार, व्यायाम, औषधोपचार यात तफावत निर्माण होते. रुग्ण एकाकी पडतो. म्हणून माणुसकीचा प्रथम हात कुटुंबाकडून हवा असतो. जगण्याचे बळ कुटुंबाकडून मिळाल्यास रुग्ण स्वतःची काळजी घेतो. एडस् संसर्गजन्य नसल्याने रूग्णाबरोबर दैनंदिन जीवन जगल्यासच रुग्णाला आधार मिळतो. रुग्ण मनाने पूर्ण खचलेला असतो,



त्याला फक्त मरण दिसत असते. परंतु जेव्हा शासकीय स्तरावरून, स्वयंसेवी संस्थांकडून जनजागृतीद्वारे प्रबोधन, समुपदेशन केले जाते आणि तेव्हा रुग्णाला समजते मृत्यू शेवटचा पर्याय असला तरी मृत्यूला दूर ठेवता येऊन जीवन जगता येते. लग्न करता येते. आई मुलाला जन्म देऊ शकते. एच.आय. व्ही.ची लागण असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्ताद्वारे, दूषित रक्त असलेल्या सुई, इंजेक्शनमधून, सांसर्गिकमातेकडून तिच्या बाळाला प्रसूतीवेळी किंवा स्तनपान करतांना होते. याचा विषाणू सहजरीत्या शरीराच्या बाहेर जगू शकत नाही. सार्वजनिक स्वच्छतागृह वापरल्यामुळे, आलिंगन दिल्याने, हातात हात घेतल्याने बाधित रुग्णाचे जेवणाचे भांडे, कपडे किंवा रुग्ण खोकलल्याने, डास चावल्याने एच.आय.व्ही. प्रसार होत नाही. वेळीच उपचार न मिळाल्याने दुसरे अनेक आजार शरीराची प्रतिकारशक्तीकमी करून रुग्णाचा मृत्यू होतो. प्रतिकारशक्ती अभावी संधीसाधू आजार बळ धरतात. म्हणून एच.आय.व्ही. ची तपासणी करून भविष्यातील निरोगी आयुष्याची काळजी घ्यावी. आजार गंभीर आहे त्याचे परिणाम तसेच दिसून येतात. साधारणपणे कुटुंबव्यवस्था डगमगीत होते. जीवनाची जगण्याची आशा संपली असे वाटते, औषधोपचाराचा खर्च वाढतो, बाधित जन्मलेल्या बालकाच्या पालकत्वाचा प्रश्न, काम करण्याची बाधित व्यक्तीची शक्ती कमी होते.

नैराश्यमय जीवनाचा परिणाम स्वतः अन् कुटुंबावर होतो. राष्ट्रीय विकासावर परिणाम होतो. रुग्णाची काळजी घेऊन मानवताभाव आवश्यक असतो. शासकीय स्तरावरून रुग्णाची माहिती दिली जात नाही. त्याबाबत गुप्तता ठेवली जाते. शासनेचे प्रयत्न, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, स्वयंसेवी संघटना यश फाउंडेशन इ. याच दिनाचे औचित्य साधून बाधित रुग्णाला जीवन सुलभ व्हावे, लोकांनी घृणा करून नये त्यासाठी जनजागृती करून आधार देतात. संशोधनात्मक दृष्टीने एडस् प्रतिबंधात्म्क लस शोधण्याचे कार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. जेणेकरून एच.आय. व्ही. बाधित रुग्णाची संख्या घटेल. मागील तीन वर्षात एच.आय.व्ही. रुग्णसंख्येत घट दिसून येते. प्रत्येकांना स्वतःची काळजी घ्यावी ज्यामध्येराज्या-राज्यात कामगार शहराकडे

विशेष



प्रा.जयश्री जाधव-कदम

धाव घेतात. स्थलांतराचे प्रमाण कमी व्हावे. नवीन रुग्ण तयार होऊ नये म्हणून स्वतःच दक्षता घ्यावी अन्यथा एच.आय.व्ही. चा विषाणू शरीरात प्रवेश करतो. परंतुरुग्णाला खबर नसते. एच.आय.व्ही. ची लागण होण्याची कारणं माहित आहे. मनात शंका असो वा नसो आपली तपासणी करून घ्यावी. शासनाकडून विशेष सुरक्षा तपासणीत घेतली जाते. आजार आपल्यापासून चार हात दूर राहावा यासाठीजनजागृती करण्यात समाजातील लोकसहभाग वाढवावा, मानवताभाव रुग्णाला बळ देणार तर जनजागृतीने एच.आय.व्ही. एडस् प्रमाण कमी होईल.

आजच्या जीवघेण्या अर्थार्जनासाठी धावपळ करावी लागते. अनेक आजार थैमान घालत आहे. आजाराला वयाची, शिक्षणाची, जातीची, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष भेदाची अट नसते. प्रतिकारशक्ती क्षीण झाल्यास आजार डोके वर काढतात. शरीर खूप छान दिसते पण शरीरात कोणते आजार दडलेले हे कळण्यासाठी वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असते. आपल्या निरोगी जीवनासाठी.

ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

# स्वामी विवेकानंद - विश्वबंधुत्व



आज २१व्या शतकामध्ये जगाच्या कल्याणासाठी, मानवतेसाठी स्वामी विवेकानंद विचारांची अत्यंत आवश्यकता आहे. जगाला विश्वबंधुत्व समजावून सांगतांना स्वामींचे विचार अमेरिकेच्या शिकागो परिषदेमध्ये शंखनाद करत होते. अमेरिकेच्या भूमीत भारताचा सुपुत्र सत्याची जाणीव करून देत होता. मनुष्य तत्वाची मांडणी समस्या जगाला पटवून देत होते. कारण पूर्वी आणि आजही जगाने भारताने देखील धर्म, पंथ, जात, प्रांतभेद निर्माण करून सत्य समजण्याच्या वेगवेगळ्या व्याख्या करून जीवनाचा प्रवास सुरु ठेवला आहे. पण जीवनाचा प्रवास सागराला नदी मिळते असाच आहे. समस्या सोडवितांना बंधुत्व जपा हाच संदेश स्वामी विवेकानंद देतात. भारतावर शतकानुशतके अनेकांनी आक्रमणे केली, अन्याय-अत्याचार केले तरीही सारे सहन करून सर्वांचे मंगल व्हावे, कल्याण व्हावे हाच संस्कार सांगणारी आमची माती आहे. हाच विश्वबंधुत्वाचा भाव स्वामी आपल्या भाषणातून शिकागोमध्ये देत होते. लोक मंत्रमुग्ध होऊन ग्रहण करत होते. माणसाने माणसावर प्रेम करावे, जीवन जगण्याची कला सर्वश्रेष्ठ आहे आणि बुद्धीच्या बळावर कला साध्य करण्यासाठी ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. ज्ञानाच्या बळावर मन जिंकता आले कि जग जिंकणे सोपे होते. भारताच्या मातीतील एक तेजस्वी युगपुरुष एक सन्यासी बनून जगासमोर भारताचे प्रतिनिधित्व करत आपल्या मातीची सहिष्णुता, सत्य, संस्कार आकाश आणि अवकाश मनुष्य तत्वाचे चिंतन विश्वबंधुत्व निर्माण करण्यासाठी जगाला भारतीयत्व पटवून देत होते. 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' अर्थात उठा, जागे व्हा, ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका. हाच संदेश स्वामी विवेकानंद समस्त मानवाला देतात. स्वातंत्र्याचा, स्वधर्माचा, स्वाभिमानाचा महामंत्र देणारे तेजस्वी व्यक्तिमत्व हिंदू धर्म, हिंदू संस्कृती, हिंदुत्वाचे दाखले आमच्या भूमीत आहेत. महान भारतीय संस्कृती आणि तेजस्वी हिंदुत्व माझ्या मातीत दडलेलं आहे. आपण आमच्या भूमीत या अतिथी देवो भव. आमचा आविष्कार बंधुत्वाचा, आमची सहिष्णुता महान आहे. म्हणून विश्वकल्याणाचा मुल संस्कार स्वामीजींनी शिकागो येथे केला. शिकागो परिषदेमध्ये स्वामीजींचा आवाज-शब्द-विचार उमटत होते तेव्हा सर्वांना जाणीव झाली कि आपल्याला एका वेगळ्याच गोष्टींची जाणीव करून देण्यासाठी भारतीय युवक तेजस्वीपणे भाषण देत आहे. प्रत्येक भाषणाची उत्कृष्टता वाढविणारी होती. संत ज्ञानेश्वरांनी १६व्या वर्षीच ज्ञानाचा सागर दिला. स्वामी विवेकानंदांनी विश्वबंधुत्वाची, विश्वकल्याणाची शिकवण दिली. आज त्यांच्या विचारांची खरी गरज आहे. त्याही काळी देशात सामाजिक प्रश्न होतेच. दारिद्र्यता, गरिबी, धर्म-धर्मवाद वैर निर्माण करणारे होते. आजही देशात दारिद्र्य, गरिबी, धार्मिक वाद आहेतच. स्वामींच्या विचाराने घेतल्यास सेवा, परमधर्म, समन्वयाची अत्यावश्यकता आहे.

विशेष



प्र.[illegible]

देशातील दारिद्र्यता स्वामींना भारत भ्रमणमधून दिसून आहे. तीच स्थिती आज आहे. अनेक आश्वासने, योजना, पंकेज फक्त मलमपट्टीसारखे आहेत. दारिद्र्य दूर करण्यासाठी धर्माच्या संकल्पना बदलणे, ईश्वराच्या संकल्पना बदलणे आवश्यक आहे. कोणताही धर्म मानवाने दारिद्र्यात जीवन जगावे अन् धर्मांच्या नावाखाली वैर निर्माण करावे हे सांगणारा नाही. स्वामीजी म्हणतात, दारिद्र्यातील लोकांना पूजा म्हणजे गरिबांमध्ये जा अन् त्यांना दोन घास द्या. मांगल्याचे गाणे गा म्हणजे कल्याण होईल. गरिबांविषयी आस्था, सेवा करा. गरीब-श्रीमंती दरी दूर करण्यासाठी बंधुत्वाने जगा. बंधुत्वाचा सागर जगाचे कल्याण करणारा आहे. धर्माने भांडू नका, एकात्मतेने गाणे गा. हेच माझ्या मातीत आहे. भारतातील प्रामाणिक माणसे भारताच्या मनुष्यबळाचा आज जगाला उपयोग होणार आहे. जगाचे सर्व प्रश्न शांतीच्या, सत्याच्या मार्गाने, मनुष्य कल्याणासाठी भारत भूमी श्रेष्ठ आहे. हेच स्वामींनी जगाला सांगितले. आजही जगाला गरज आहे भारतीय विचारांची, जो मानवी मांगल्याच्या वाटेवर अनेक सत्पुरुष, महात्मे या भूमीला लाभले. जगाला अन् देशाला विविध समस्यांनी घेडसावले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी स्वामी विवेकानंदांच्या विश्वबंधुत्वाने यश मिळविता येईल. सत्य बंधुत्वासाठी, आदरभाव, प्रेमभाव तणावाला दूर करतो. म्हणून आज स्वामी विवेकानंदांच्या सुंदर वाटेवर प्रत्येकाने चालणे गरजेचे आहे, स्वतःपासून सुरुवात करून दुसऱ्याचे कल्याण साधण्यासाठीच माझा जन्म आहे, असा भाव जागृत ठेवल्यास स्वामींच्या विचारांची ज्योत पेटलेली दिसेल. त्याचा प्रकाश संपूर्ण भारतात दिसेल. अन् जगाला विश्वबंधुत्वाची प्रचीती येईल.

(मो.९८८११३८८५८)

हे मराठी दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक-**मुख्य संपादक**-चंद्रशेखर आत्माराम पाटील (मोबा. [illegible]) लिबर्टी पॉईंट, राका कॉलनी, युनियन बँकेसमोर, जाखडी कॉर्नर, शरणपूररोड, नाशिक - ४२२००२ येथून प्रकाशि[illegible] सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, [illegible] **निवासी संपादक** - जयंत भीमराव महाजन, मोबा: ९४२०६९१४२० (पीआरबी कायद्यानुसार [illegible]

ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

दै. दिव्य मराठी मधील 'दि.२७/११/२०१९ मधिल 'संविधान दिन' उपक्रमाचे वृत्त

दिव्य मराठी विशेष • विद्यार्थ्यांना दिली संविधानाची सखोल माहिती; काही ठिकाणी मान्यवरांचे व्याख्यान; चित्रकला स्पर्धा

# देवळाली कॅम्पमधील विविध शाळांत संविधान दिन साजरा

प्रतिनिधी । देवळाली कॅम्प



येथील एसव्हीकेटी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयजी मेधणे यांनी भूषविले. या वेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डी. एस. शिंदे, डॉ. व्ही. डी. करडी, प्रा. एस. एल. भोज, एस. के. जाधव, प्रा. ए. एम. पटेल, प्रा. डी. एम. [illegible] उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी आपल्या मनोगतामध्ये भारतीयांसाठीचे 'संविधानाचे' महत्त्व अधोरेखित केले. 'संविधान' हे [illegible] जात, धर्म, विषमता या [illegible] व भारतीयांना [illegible] घेऊन जाणारे तत्त्वज्ञान आहे [illegible] राष्ट्रीय एकता, एकात्मता व संपूर्ण अखंडत्व टिकून राहू शकले. याकरिता देशातील सर्वच नागरिकांनी या संविधानाचा आदर करणे आवश्यक असल्याचे व्यक्त केले. यावेळी प्राचार्यांनी घटनेच्या सरनाम्याचे विद्यार्थ्यांकडून शपथ रूपात वाचन करून घेतले.

करडी यांनी आपल्या मनोगत मांडताना संविधानाचे लोकशाहीतील महत्त्व विशद केले. संविधान निर्मितीचा इतिहास आणि त्यासाठी राज्यघटनाकारांनी [illegible] प्रयत्न केले याचे वर्णन त्यांनी आपल्या मनोगतात मांडले. यानंतर [illegible] [illegible] कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. एस. कावळे यांनी केले. एन. एस. एस. अधिकारी प्राध्यापक मिलिंद ठाकरे यांनी आभार मानले. तर सूत्रसंचालन सविता आहेर यांनी केले. या कार्यक्रमास [illegible] विद्यार्थी [illegible] उपस्थित होते.

**रुसी इराणी सेंटरमध्ये विशेष मुलांनी चित्र रेखाटले**

रुसी इराणी सेंटर येथील विशेष मुलांची शाळा असलेल्या रुसी इराणी सेंटर येथे मुलांनी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चित्रात रंग भरत अनोखे अभिवादन केले. प्रारंभी प्रांगणात शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून घेतले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

**कॅन्टोन्मेंट बोर्ड हायस्कूल**

शाळेत आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापिका [illegible] यांनी संविधानाचे महत्त्व [illegible] व [illegible] शिंदे यांनी [illegible] संविधान मार्गदर्शक [illegible] सांगितले. [illegible] मानले. [illegible]

H.O.D.
Department of Political Science
Smt. Vimlaben Khimji Tejookaya,
Arts, Science & Commerce College,
Deolali-Camp, (Nasik)

S.V.K.T. Arts, Science & Commerce College, Deolali Camp, Nasik

PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya,
Arts, Science & Commerce College,
Deolali-Camp, (Nasik)

ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts,
Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik)

*दै. गांवकरी मधील 'दि.२७/११/२०१९ मधिल 'संविधान दिन' उपक्रमाचे वृत्त*



## विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालय

भारतीय संविधान हे खऱ्या अर्थाने जात, धर्म, विषमता, यापलीकडे भारतीयांना मानवतावादाकडे घेऊन जाणारे तत्वज्ञान आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय मेधने यांनी केले. येथील मविप्र संचालित श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त ते बोलत होते. सर्व उपस्थित व सर्व विद्यार्थ्यांकडून घटनेच्या सरनाम्याचे शपथ रूपात वाचन करून घेण्यात आले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. कापडी यांनी संविधानाचे लोकशाहीतील महत्त्व विशद केले. त्यानंतर परिसरातून विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली. यावेळी उपप्राचार्य प्रा. डी. एस. शिंदे, प्रा. एस. एल. भोज उपस्थित होते.

H.O.D.
Department of Political Science
Smt. Vimlaben Khimji Tejookaya,
Arts, Science & Commerce College,
Deolali-Camp. (Nasik)

S. V. K. T. Arts, Science & Commerce College, Deolali Camp, Nasik

PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya,
Arts, Science & Commerce College
Deolali-Camp, (Nasik)

ATTESTED

PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts,
Science & Commerce College
Deolali-Camp, Nashik